पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर

दिनांक 13/02/2020 (गुरूवार)

(दुपार)

---

## दुखापत

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 2 कि. मी. अंतरावर कोलार नदी सावनेर शिवार येथे दिनांक 04/02/2020 चे 16.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. मायाबाई दामोजी, वय 60 वर्ष, रा. झोपडपट्टी सावनेर यांचे पती नामे– दामु राजेराम कमाने, वय 65 वर्षे, रा. सावनेर हे गाय, बकऱ्या घेउन कोलार नदीवर जनावराला पानी पाजण्यास गेले होते. दरम्यान आरोपी नामे– मुकेश गव्हाने, रा. सावनेर याने "तुम्ही नदीतील पानी गाय बकऱ्यांना का पाजले." या कारणावरून आरोपीने दामु कमाने याच्या सोबत भांडन केले. तसेच आरोपीने फिर्यादीच्या पतीला काठीने डाव्या हातावर, उजव्या पायावर मारहाण करून जखमी केले तसेच डाव्या हात हा फॅक्चर झाल्याने उपचारकामी मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 325 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार राजेन्द्र यादव 8888821339 हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यू

1) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर भानेगाव येथे दिनांक 12/02/2020 चे 13:00 वा. पुर्वी जयप्रकाश सुरेश ढोके, वय 27 वर्ष, रा. भानेगाव याने त्याच्या राहत्या घरी अज्ञात कारणाने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रितेश नरेश ढोके, वय 29 वर्ष, रा. नविन बिना भानेगाव यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. खापरखेडा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार निलेश बिजवाड 8806666469 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 12 कि. मी. अंतरावर 14 मैल चिचभवन येथे दिनांक 12/02/2020 चे 15:15 वा. पुर्वी प्रणय देवीदास मोरे, वय 26 वर्ष, रा. आर्वी नाका, म्हाडा कॉलनी वर्धा, ह. मु. सुनिल बोरकर यांच्या घरी किरायने 14 मैल याने राहत असलेल्या किरायच्या घरी अज्ञात कारणाने रूममध्ये सिलींग फॅनला प्लास्टिक कोटेड वायरने बांधुन गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सुनिल दशरथ बोरकर, वय 42 वर्ष, रा. 14 मैल कहमेश्वर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार दिलीप सपाटे 9823998476 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर